माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १५३४/२०२१**

**अपिलार्थी, श्री. सत्यवान आसाराम रामटेके,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,**
**सामाजीक वनिकरण** देसाईगंज (वडसा), ता. देसाईगंज जि. गडचिरोली

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी,**
सामाजीक वनीकरण विभाग, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०४.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०३.२०२१ | निरंक | २४.०५.२०२१ | २२.०६.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ३०.०३.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " वित्तीय वर्ष-२०१९ पासून ते आजतागायत ३३ कोटी वृक्ष लागवड योजनेतील सर्व प्रमाणके (व्हाऊचर) ची सत्यप्रत देण्यात यावी " याविषयी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २४.०५.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “ माहिती देण्यास टाळाटाळ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.०६.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २२.०६.२०२१ अन्वये, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजीक वनीकरण,वडसा यांना कळविण्यात येते की, अपिलार्थी यांनी मागीतलेली प्रमाणकांची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखालील असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. रामाआ-२०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा. दिनांक ०१.०२.२०१७ नुसार त्यांनी मागणी केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामुल्य् उपलबध करुन देण्यात यावी (त्यापेक्षा जास्त माहिती असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.) मात्र सदर माहिती देतांना कोणत्याही व्यक्तीची वैयक्तीक माहिती पुरवठा होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १० दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावा, असे आदेशीत केले.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १४.०७.२०२१ रोजी** " माहिती दिलेली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १६.०७.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.०४.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री. मधुकर गणपत मेश्राम उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी, श्री. मनोज नामदेव चव्हाण उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २२.०६.२०२१ रोजीच्या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र वडसा यांनी दिनांक ०६.०७.२०२१ रोजी अपिलार्थीस प्रतिसाद दिलेला असून त्यात, “प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशामध्ये कोणत्याही व्यक्तीची वैयक्तिक स्वरुपाची माहिती पुरवठा होणार नाही याची दक्षता घेण्याचा स्पष्ट सुचना आहेत. त्या अनुषंगाने प्रमाणकांमध्ये वैयक्तिक स्वरुपाचे आधार नंबर, बँक खाते क्रमांक व स्वाक्षरी अशी गोपनीय स्वरुपाची माहिती असल्याने प्रमाणकांचा (व्हाऊचर) पुरवठा करता येणार नाही”, असे नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यास उपस्थित केलेल्या अडचणी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(ञ) नुसार योग्य असल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क व समन्वय साधून संकलित केलेल्या ३३ कोटी वृक्ष लागवडीबद्दलच्या विषयांकित माहितीचे जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामुल्य अवलोकन प्राप्त करुन घ्यावे व त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अवलोकनाअंती त्यांनी चिन्हांकित केलेल्या माहितीतील वैयक्तिक स्वरुपाची माहिती वगळून अथवा मुखवटा (Mask) करुन अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०४.२०२३**

जावक क्रमांक 4893 दिनांक 21 SEP 2023